# फिनोलेक्स व मुकूल-माधव फौंडेशनचे कार्य स्तुत्य

## श्याम देशपांडे : जिल्ह्यातील ३१४ अपंगांना मॉडिफाय खुर्च्यांचे वाटप

सातारा : प्रतिनिधी

समाजात चांगले काम करणारे लोक आजही आहेत. त्यामुळेच जगाचे अस्तित्व टिकून आहे. सामाजिक बांधिलकी जोपासत अपंगांना आधार देणारा फिनोलेक्स व मुकूल-माधव फौंडेशनचा उपक्रम स्तुत्य आहे, असे गौरवोद्गार महसूल विभागाचे अतिरिक्त आयुक्त श्याम देशपांडे यांनी काढले.

साताऱ्यात फिनोलेक्स व मुकूल-माधव फौंडेशनच्यावतीने कनिष्क हॉलमध्ये अपंग विद्यार्थ्यांना सेरेब्रल पाल्सी चेअरर्स वाटप करण्यात आले. त्यावेळी बोलताना मुख्य कार्यकारी अधिकारी नितीन पाटील म्हणाले, मुकूल-माधव फौंडेशनने अपंगांना खुर्च्यांची केलेली मदत मोलाची आहे. त्यामुळे या अपंगांचे कष्ट कमी होवून त्यांच्या मातांनाही मदत होईल. जिल्हा परिषदेचे फौंडेशनला यापुढेही सहकार्य राहिल. श्री. छ. दमयंतीराजे भोसले म्हणाल्या, मुकूल-माधव फौंडेशनने पुण्यात उल्लेखनीय काम केले आहे. त्यांच्या कार्याला पाठिंबा राहिल. डॉ. परवेझ ग्रँन्ट यांनीही मनोगत व्यक्त केले. दरम्यान, जिल्ह्यातील प्राथमिक शाळेतील दिव्यांग मुलांना मुकूल-माधव फौंडेशन व फिनोलेक्स कंपनीकडून १०० मॉडिफाय चेअर, ३०० व्हील चेअर तसेच ३०० कमोड यांचे वाटप खा. श्री. छ. उदयनराजे भोसले, श्री. छ. दमयंतीराजे भोसले, अतिरिक्त आयुक्त शाम देशपांडे, जिल्हाधिकारी अश्विन मुद्गल, मुख्य कार्यकारी अधिकारी नितीन पाटील, कूपर उद्योग समुहाचे फारुख कूपर, फिनोलेक्स कंपनीच्या डायरेक्टर व मुकूल-माधव फौंडेशनच्या मॅनेजिंग ट्रस्टी रितू छाबरिया, जाल कूपर, यांच्या हस्ते करण्यात आले. दरम्यान, अपंग विद्यार्थ्यांनी 'मेरी माँ', 'खेळताना रंग बाई होळीचा,' या गाण्यांवर रेकॉर्ड डान्स सादर केला. त्याला उपस्थितांनीही दाद दिली. जिल्हा परिषदेच्यावतीने मान्यवरांच्या हस्ते रितू छाबरिया यांना मानपत्र देण्यात आले. कार्यक्रमास प्राथमिक शिक्षण विभागाच्या शिक्षणाधिकारी पुनीता गुरव, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. दिलीप माने, मुकूल माधव फाँडेशनचे धानोरकर, डॉ. संजय लावंड, डॉ. भारत पाटील, मंगेश कांचन आदि उपस्थित होते.




सातारा : अपंगांना सेरेब्रल पाल्सी चेअरर्सचे वाटप करताना खा. श्री. छ. उदयनराजे भोसले, श्री. छ. सौ. दमयंतीराजे भोसले, श्याम देशपांडे, अश्विन मुदगल, नितीन पाटील, रितू छाबरिया व इतर. (छाया : देवराज कामाठी)